# महिलेच्या मानेतून १ किलो वजनाची थायरॉईड गाठ काढण्यात डॉक्टरांना यश

**पुणे : प्रतिनिधी**

एका ३३ वर्षीय रुग्ण महिलेच्या मानेतून १ किलो वजनाची थायरॉईड गाठ काढण्यात डॉक्टरांना यश मिळाले आहे. रूग्णालयातील थायरॉईड आणि एंडोक्राइन सर्जन डॉ. रितेश अग्रवाल, कार्डियाक सर्जन डॉ. कृष्णा प्रसाद आणि ईएनटी सर्जन डॉ. प्रीती धिंग्रा यांच्या नेतृत्वाखाली एका टीमने ही यशस्वी शस्त्रक्रिया केली आहे. महिलेला गेल्या २ वर्षांपासून तीव्र श्वसनचा त्रास जाणवत होता. अनेक डॉक्टरांकडून उपचार घेतले. परंतु, प्रकृतीत सुधारणा होत नव्हती. महिलेची बिघडती प्रकृती लक्षात घेता कुटुंबियांनी त्यांना रूग्णालयात दाखल केले. वैद्यकीय चाचणीनंतर महिलेच्या मानेमध्ये गाठ असल्याचं दिसून आले.त्यानंतर एक्स-रे, सीटी स्कॅन आणि थायरॉईड फंक्शन चाचण्या करण्यात आल्या.त्यानंतर महिलेवर शस्त्रक्रिया करण्यात आली. महिलेला थायरॉईड ग्रंथी वाढून गलगंड झाले होते. जेव्हा या भागात मोठ्या गाठी असतात, तेव्हा ते श्वसननलिकेवर दाब येतो ज्यामुळे योग्य ऑक्सिजन पुरवठा होत नाही आणि रुग्णांना श्वासोच्छवासाच्या समस्यांना सामोरे जावे लागते. तसेच या गाठीच्या वजनामुळे छातीत जडपणा येतो. थायरॉईड ग्रंथीला श्वसननलिकेच्या दोन्ही बाजूला दोन बाजू असतात आणि तिच्या दोन्ही बाजूंना मोठ्या गाठी असतात. ते इतके मोठे होते की मानेपासून ते छातीच्या आत शिरते आणि छातीतून जवळजवळ हृदयापर्यंत पोहोचते. अशा प्रकरणांमध्ये, गोइटर योग्यरित्या काढण्यासाठी छातीचे हाड कापणे आवश्यक आहे.